**वरिष्ठ भूवैज्ञानिक**
**भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा**
**अहमदनगर**

# पाणी गुणवत्ता तपासणी प्रयोगशाळांकरिता कंत्राटी पध्दतीने भरावयाच्या पदांची जाहिरात कंत्राटी

Office Phone No. 0241-2326017

पाणी गुणवत्ता तपासणी प्रयोगशाळा,भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, अहमदनगर अंतर्गत असणा-या पाणी गुणवत्ता तपासणी प्रयोगशाळांची प्रभावी अमलबजावणी करणे साठी मानधन व करार सेवेवर (कंत्राटी पध्दतीने) खालील प्रमाणे जिल्हा प्रयोगशाळा व तालुका स्तरावरील उपविभागीय प्रयोगशाळां साठी खालीलप्रमाणे आरक्षण निहाय रिक्त पदे भरण्याकरिता दिनांक १६.०१.२०१६ रोजी वर्तमानपत्रात तसेच जिल्हा परिषद अहमदनगर व चाणक्य सॉफ्टवेअर सर्व्हिसेस प्रा.लि.पुणे यांच्या संकेतस्थळावर देखील जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली होती.

तथापी खालील दोन पदांकरिता ऑनलाईन पध्दतीने पात्र उमेदवारांकडून अर्ज कमी आल्यामुळे खालील दोनच पदांकरिता फेर जाहिरात देण्यात येत आहे. सदर चे विहित नमुन्यातील अर्ज दिनांक २२ फेब्रुवारी २०१६ रोजी सायं. ०५:०० वाजेपर्यंत ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहे. उमेदवारांना ज्या पदासाठी अर्ज करावयाचा आहे, त्याबाबत ऑन लाईन अर्जामध्ये पदनाम स्पष्ट नमुद करावे.

| अ.क्र | पदाचे नाव | पद संख्या | आरक्षण | दरमहा मानधन | किमान शैक्षणिक अर्हता | अनुभव |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | रसायनी | ०२ | अनु.जाती-१<br>अनु जमाती -१ | १२०००/- | बी-एस्सी ( रसायनशास्त्र) MS-CIT उत्तीर्ण. प्राधान्य एम.एस्सी ( रसायन शास्त्र) | प्रयोगशाळेतील पाणी नमुने तपासणिचा / पाणी गुणवत्ता विषयक कामाचा किमान -०१ वर्षाचा अनुभव |
| २ | अनुजैविक तज्ञ | ०२ | अनु जमाती -१<br>विजाभज -१ | १२०००/- | बी-एस्सी ( सुक्ष्मजीवशास्त्र) MS-CIT उत्तीर्ण. प्राधान्य एम.एस्सी ( सुक्ष्मजीवशास्त्र) | प्रयोगशाळेतील पाणी नमुने तपासणिचा / पाणी गुणवत्ता विषयक कामाचा किमान -०१ वर्षाचा अनुभव |
| | एकूण | ०४ पदे | | | | |

**१. उमेदवारांना सूचना :-**

१. वरील पदांची नियुक्ती जिल्हास्तरावर व तालुकास्तरावर देण्यात येणार आहे.
२. सदरची पदे शासनाने दिलेल्या सूचनेनुसार पुर्णपणे कंत्राटी असुन या पदांना शासन सेवेचे फायदे लागू नाहीत सदरची पदे ही योजना चालू असेपर्यंत किंवा पुढील आदेश येई पर्यत चालू राहतील.
३. निवड प्रक्रियेदरम्यान किंवा नियुक्ती नंतर कोणत्याही क्षणी उमेदवार अपात्र असल्याचे लक्षात आल्यानंतर अनुक्रमे त्या उमेदवारास निवड प्रक्रियेच्या त्या टप्प्यावर बाद केले जाईल किंवा नियुक्ती नंतर सेवेतून कमी केले जाईल.
४. ऑनलाईन अर्ज भरतेवेळी जाहिरात काळजीपूर्वक वाचावी. उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज करतेवेळी सर्व आवश्यक कागदपत्रे व स्वत:चा अलिकडील काळातील पासपोर्ट साईज फोटो व स्कॅन केलेली सही स्वत: जवळ असल्याची खात्री करावी. फॉर्म भरतेवेळी फोटो,सही स्कॅन करुन अपलोड करावी. आवश्यक माहिती भरल्यानंतर संगणक प्रणाली तुमचा लॉग इन आय डी व पासवर्ड निर्माण करुन तुम्हाला तुमच्या स्क्रिनवर दाखवेल. आणि तुम्ही पुरविलेल्या मोबाईल क्रमांकावर एस एम एस करेल. (कृपया आपला मोबाईल क्रमांक अचूक टाकावा.) तुमचा लॉगीन आय.डी.म्हणजेच तुमचा अर्ज क्रमांक असेल.
५. उमेदवार महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असल्याचे प्रमाणपत्र आवश्यक आहे.
६. उमेदवारास एकावेळी एकाच पदासाठी अर्ज करता येईल.

## २. वयोमर्यादा -

उमेदवाराचे वय दिनांक ३१.१२.२०१५ रोजी राखीव प्रवर्गासाठी ३८ वर्ष व खुल्या प्रवर्गासाठी ३३ वर्षापेक्षा जास्त नसावे.

## ३. ऑनलाईन अर्ज करावयाची पध्दतः-

१. ऑनलाईन अर्ज http://exams.chanakyasoft.in/gsdanagar किंवा http://nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार सदरच्या संकेतस्थळावर लॉगीन करुन दिलेल्या सुचनांप्रमाणे आपले अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरावेत अथवा त्याबाबत काही मदतीची आवश्यकता असल्यास जाहिरातीत नमुद केल्याप्रमाणे Chanakya Software Services Pvt.Ltd.Pune च्या अधिकृत प्रशिक्षण केंद्राशी संपर्क साधावा. सदरच्या अधिकृत केंद्राचा email ID – gsdanagar2016@gmail.com किंवा ८८०५००४२५८ या क्रमाकांवर संपर्क साधावा.

२. माहिती भरल्यानंतर अर्जाची प्रिंट काढून घ्यावी. ती आपल्या माहितीसाठी जतन करुन ठेवावी. अर्जदाराने नियमितपणे वेबसाईट पहावी. ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर अर्जाची प्रत प्रिंट काढून जिल्हा परिषद अहमदनगर किंवा Chanakya Software Services Pvt.Ltd.Pune ला पाठविण्याची आवश्यकता नाही. लेखी परिक्षेचे ओळखपत्र परिक्षेपुर्वी तुमच्या लॉगीनमध्ये व वेबसाईटवर उपलब्ध राहील. यासाठी वेगळा पत्रव्यवहार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

३. पदासाठी असणारी किमान अर्हता आणि पात्रता धारण करणाऱ्या व लेखी परिक्षेत पात्र ठरणाऱ्या उमेदवारांना या पदासाठी घेण्यात येणारी परिक्षेची रुपरेषा, वेळापत्रक, परिक्षा केंद्र, बैठक क्रमांक इत्यादींबाबतची माहिती http://exams.chanakyasoft.in/gsdanagar या संबंधीत **Website** वर वेळोवेळी उपलब्ध करुन दिली जाईल.

४. उमेदवारांनी अर्जासोबत माहिती सादर करतांना सतत कार्यान्वित असलेला अचुक भ्रमणध्वनी (**Mobile Cell Phone**) क्रमांक व ई-मेल आय.डी.नमुद करावा जेणेकरुन आपणास संपर्क करुन आवश्यक ती माहिती देणे सुलभ होईल.

५. ज्या उमेदवारांनी ऑनलाईन नोंदणी केली आहे आणि आवश्यक आवेदन शुल्क अदा केले आहे व संपुर्ण माहिती भरुन प्रिंट काढलेली आहे तसेच जे उमेदवार पदाच्या पात्रतेनुसार पात्र ठरले आहेत त्यांना दि. ०३/०३/२०१६ पासुन लेखी परिक्षेचे परिक्षा प्रवेशपत्र (**Hall Ticket/Admit card**) त्यांच्या लॉगीन आय.डी. वरुन किंवा http://exams.chanakyasoft.in/gsdanagar या संकेतस्थळावरुन **Download** करता येईल. उमेदवाराची लेखी परिक्षा १३/०३/२०१६ रोजी घेण्यात येईल.

६. परिक्षा केंद्रावर ओळखपत्रासह परिक्षा सुरु होण्यापुर्वी एक तास अगोदर उपस्थित रहाणे आवश्यक आहे, उशिरा येणाऱ्या व प्रवेशपत्र न आणणाऱ्या उमेदवारांना परिक्षेकरीता प्रवेश दिला जाणार नाही. तसेच उमेदवाराने स्वतःचे फोटो असलेले ओळखपत्र उदा. वाहन परवाना, पॅनकार्ड, निवडणुक ओळखपत्र इ. सोबत आणावे.

७. लेखी परिक्षेचा निकाल http://exams.chanakyasoft.in/gsdanagar या संकेतस्थळावर तसेच जिल्हा परिषदेच्या **http://nagarzp.gov.in//** या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत येईल.

८. पदांची उपलब्ध संख्या व आरक्षण विचारात घेता लेखी परिक्षेत गुणवत्तेच्या आधारे निवडलेल्या उमेदवारांची यादी - http://exams.chanakyasoft.in/gsdanagar च्या संकेतस्थळावर प्रसिध्द केली जाईल व जिल्हा परिषदेच्या नोटीस बोर्डावर लावण्यात येईल. याबाबत उमेदवारास कोणत्याही प्रकारचा दावा करता येणार नाही. उमेदवारांच्या मूळ कागदपत्रांची पडताळणी झाल्याशिवाय अंतिम निवड ग्राहय धरण्यात येणार नाही.

९. उमेदवारांना ऑनलाईन अर्ज भरण्याबाबत काही अडचणी आल्यास त्यांनी ८८०५००४२५८ या क्रमांकावर संपर्क साधावा.

१०. परीक्षा शुल्क भरण्याची सोय ही SBI बँकेत चलना मार्फत (बँक चलन) किंवा online payment मार्फत करण्यात आली आहे.त्यांची सविस्तर माहिती http://exams.chanakyasoft.in/gsdanagar या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

**४. परिक्षा शुल्क-** उमेदवारांनी प्रत्येक पदांसाठी पुढील प्रमाणे परिक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे. सदरील शुल्क हे नापरतावा असेल.

परिक्षा शुल्क खुल्या प्रवर्गासाठी रूपये ३००/-, मागासवर्गीयांसाठी रूपये १५०/- राहील. तसेच बँकेचा आकार (Bank Charges)/ऑनलाईन पेमेंट गेटवे चार्जेस रु ५० इतके उमेदवारांनी स्वत: भरावयाचे आहे. परिक्षा शुल्क रोखीने स्टेट बँक ऑफ इंडिया च्या कोणत्याही शाखेत संगणकीय चलनाव्दारे भरावे किंवा Chanakya Software Services Pvt.Ltd.Pune यांचे गेट वे पध्दतीने एटीएम कार्ड / डेबिट कार्ड अथवा ऑनलाईन बॅंकिंग व्दारे भरणेची सुविधा उपलब्ध आहे. करिता जिल्हा परिषद संकतेस्थळ व http://exams.chanakyasoft.in/gsdanagar यावर login ID टाकल्यानंतर स्टेट बँक खाते क्रमांक चलनासह पैसे भरणेबाबतची Link online payment मार्फत करण्यात आली आहे.

७. उमेदवारांचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने स्वीकारण्यात येणार असल्याने अर्ज करताना शैक्षणिक कागदपत्रे, अन्य प्रमाणपत्रे जोडणे आवश्यक नाही. परंतु ऑनलाईन अर्जामध्ये संपूर्ण माहिती भरणे आवश्यक आहे. ऑनलाईन अर्ज भरताना खोटी किंवा विसंगत /दिशाभूल माहिती भरलेचे निदर्शनास आल्यास संबंधित उमेदवारावर फसवणुकीचा फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल. लेखी परीक्षेनंतर गुणवत्तेनुसार विचारक्षेत्रात असलेल्या उमेदवारांचे मूळ कागदपत्रांची तपासणी केली जाईल. तदनंतर अंतिम निवड व प्रतिक्षा यादी प्रसिध्द केली जाईल.

८. प्राप्त अर्जापैकी अर्जदाराने किमान शैक्षणिक पात्रता प्राप्त उमेदवारांना लेखी परिक्षेकामी बोलाविण्यात येईल.

९. **अर्जाचे वेळापत्रक-**

| अ.क्र | बाब | पासुन | पर्यंत |
|---|---|---|---|
| १ | ऑनलाईन अर्ज करण्याचा कालावधी | दि.१५.०२.२०१६ | दि.२२.०२.२०१६ |
| २ | ऑनलाईन परिक्षा शुल्क स्विकृती कालावधी | दि.१५.०२.२०१६ | दि.२२.०२.२०१६ |
| ३ | संगणकिय चलनाव्दारे स्टेट बँक ओफ इंडियाच्या काणेत्याही शाखेमध्ये परिक्षा शुल्क स्विकृती कालावधी | दि.१६.०२.२०१६ | दि.२४.०२.२०१६ |

१०. पदासाठी असणारी किमान अर्हता आणि पात्रता धारण करणा-या व लेखी परिक्षेस पात्र ठरणा-या उमेदवारांना या पदासाठी घेण्यात येणारी परिक्षेचे वेळापत्रक, परिक्षा केंद्र , बैठक क्रमांक इत्यादी माहिती Chanakya Software Services Pvt.Ltd.Pune च्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात येईल.

११. भरतीच्या नियमांमध्ये प्रक्रीया पुर्ण होईपावतो सुधारित शासन निर्णय / परिपत्रकानुसार बदल होऊ शकतो.

१२. उमेदवाराची लेखी परीक्षा ही कोणत्याही कागदपत्रांची पूर्व तपासणी न करता घेतली जाणार असल्यामुळे लेखी परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवाराला निवडीबाबतचे काणेतेही हक्क राहणार नाही. नियुक्तीपूर्वी, मुळ शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्रे, शाळा सोडल्याचा दाखला, नॉनक्रिमीलेअर दाखला, तसेच इतर आवश्यक ती सर्व कागदपत्रे इत्यादीची छाननी या वरिष्ठ भूवैज्ञानिक,भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा,अहमदनगर कार्यालयाचे स्तरावर केली जाईल. त्यावेळी मूळ प्रमाणपत्रे दाखविणे देखील बंधनकारक राहील. उमेदवारांने प्रमाणपत्र मिळणेकरीता सादर केलेल्या अर्जाच्या पावत्या ग्राहय धरल्या जाणार नाहीत. छाननीअंती वरील प्रमाणपत्रांमध्ये त्रुटी आढळल्यास / माहिती खोटी आढळल्यास नियुक्ती दिली जाणार नाही / नियुक्ती रद्य होईल.

१३. उमेदवारांना लेखी परिक्षा, मुलाखतीसाठी, कागद पडताळणी इत्यादी साठी उपस्थित राहण्यासाठी येण्या-जाण्याचा प्रवास खर्च वा इतर खर्च दिला जाणार नाही.

**निवड कार्यपध्दती** - उमेदवाराची निवड मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प अहमदनगर यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा निवड समिती मार्फत व कार्यपध्दतीनुसार करण्यात येणार आहे. भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा,अहमदनगर यांना पदनिहाय १० पेक्षा जास्त पात्र अर्ज प्राप्त झाल्यास त्यांची लेखी परिक्षा घेणेत येईल. लेखी परिक्षा ५० गुणांची बहूपर्यायी वस्तुनिष्ठ स्वरुपाची राहील व उत्तीर्ण उमेदवारांची २५ गुणांची तोंडी परिक्षा घेण्यात येईल.

१४. परीक्षा केंद्रावर ओळखपत्रासह परीक्षा सुरु होण्यापुर्वी एक तास आगोदर उपस्थित राहणे आवश्यक आहे. उशिरा येणा-या व प्रवेशपत्र न आणणा-या उमेंदवारांना परिक्षेकरीता प्रवेश दिला जाणार नाही. तसेच उमेदवारांनी स्वतःच्या फोटोसह असलेले ओळखपत्र उदा.-आधार कार्ड,निवडणूक ओळखपत्र, वाहन परवाना, पॅन कार्ड, इत्यादीपैकी एक सोबत आणावयाचे आहे.

- **विशेष सूचना :-**
  १. विहित पध्दतीने अर्ज नसल्यास सदर अर्ज नाकारण्याचा अधिकार मा.अध्यक्ष निवड समिती तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहमदनगर यांनी स्वतःकडे राखून ठेवला असून याबाबत उमेदवारास काहीही कळविण्यात येणार नाही
  २. पदभरती प्रक्रिया अत्यंत तर्कशुध्द व पारदर्शक पध्दतीने गुणवत्तेच्या आधारे पार पाडली जाणार असल्याने उमेदवाराने कोणत्याही प्रकारचा दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास त्यांच्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

३. निवडीसाठी शिफारस अथवा दबाव आणल्यास अशा उमेदवारस अपात्र ठरविले जाईल.

४. अर्जामध्ये दिलेली माहिती चुकीची वा खोटी आढळून आल्यास, सदर उमेदवार दंडात्मक कारवाईसाठी तसेच त्याआधारे नियुक्ती झाल्यास सेवेतून काढण्यात पात्र राहिल.

५. अर्ज केला अथवा विहीत अर्हता धारण केली म्हणजे परिक्षेस बोलावण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही.

६. नैसर्गिक आपत्ती अथवा इतर कारणास्तव विहीत दिनांकास लेखी परिक्षा घेणे शक्य नसेल तसेच जाहिरातीत नमुद दिनांकास काही बदल झाल्यास परिस्थितीनुरुप सोयीनुसार पुढील दिनांक निश्चित करुन वर्तमान पत्रामधुन व जिल्हा परिषदेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द केले जाईल.

७. प्रवर्ग निहाय पदे कमी-जास्त होऊ शकतात तसेच रिक्त पदांच्या संख्येत बदल होण्याची शक्यता असुन भरतीप्रक्रिया कोणत्याही टप्यावर रद्द करण्यांचा अथवा त्यामध्ये बदल करण्यांचा अथवा नाकारण्याचा अधिकार मा.अध्यक्ष निवड समिती तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहमदनगर यांनी राखुन ठेवलेला आहे.

८. अनुजैविक तज्ञ ( विजाभज - १ पद ) हे संभाव्य रिक्त होणा-या पदासाठी भरण्यात येत असून,पद रिक्त झालेवर सदर पात्र उमेदवारास नेमणूक देण्यात येईल.

सदस्य सचिव
जिल्हा निवड समिती
तथा
वरिष्ठ भूवैज्ञानिक
भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा
अहमदनगर

अध्यक्ष
जिल्हा निवड समिती
तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद
अहमदनगर